# इतिहास विभाग

# अहवाल २०२१-२२




**हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त भित्तीपत्रक अनावरण** **दि-१७/०९/२१**

**तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित**

**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय,उस्मानाबाद.**

**इतिहास विभाग**

# भित्तीपत्रक

भित्तीपत्रक समिती:

**विद्यार्थी -** १. चि. गुरव बालाजी दिलीपराव बी ए तृतीय वर्ष

२. कु. मगर विद्या युवराज बी ए तृतीय वर्ष

३. चि.सरकोंडे संजय पांडुरंग बी ए तृतीय वर्ष

**मार्गदर्शक** –प्रा. डॉ. कुलकर्णी जे.आर..

# भित्तीपत्रक अनावरण

## दि. १७.०९.२०२१,शुक्रवार

**उद्देश :-**

विद्यार्थ्यांच्या साहित्यिक व संकलक क्षमतांचा विकास व्हावा, तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि अभ्यासेतर वाचन व लेखनाची सवय त्यांच्यात रुजवावी, हा भित्तीपत्रक उपक्रमामागील उद्देश होय.

वरील उद्दिष्ट समोर ठेऊन प्रतिवर्षी इतिहास विभागाच्या वतीने ऐतिहासिक घटनांशी निगडीत विविध विषयावरील विद्यार्थी निर्मित व हस्तलिखित भित्तीपत्रके तयार केली जातात.

काविड-१९ च्या पार्श्वभूमीवर मागील वर्षभरात हा उपक्रम राबविता आला नाही. मात्र महाविद्यालय नियमित सुरु झाल्यानंतर हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त दि. १७ सप्टेबर २०२१ , शुक्रवार रोजी **<u>'हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील पहिला हुतात्मा: वेदप्रकाश'</u>** या विषयावरील विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित भित्तीपत्र काचे अनावरण करण्यात आले. या भित्तीपत्रकाचे संपूर्ण लेखन बी ए तृतीय वर्षाच्या चि गुरव बालाजी दिलीपराव या विद्यार्थाने केले. तर माहिती संकालनामध्ये त्याला बी ए तृतीय वर्षाच्या कु . मगर विद्या युवराज हिने मदत केली.

## उद्देशपूर्ती :-

विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील मराठवाडा/हैद्राबाद मुक्तिसंग्राम या विषयाशी संबंधित वाचन करून संदर्भ ग्रंथ , इंटरनेट वरून माहिती संकलित केली. सदर माहिती सुव्यवस्थितपणे मांडणी करून सुवाच्य अक्षरात शब्दबध्द केली. यातून त्यांच्या सृजनशीलतेला चालनाही मिळाली आणि नाविन्यपूर्ण निर्मितीचा आनंदही मिळाला.

Tapaswi public charitable trust,Yevati's
Venkatesh Mahajan Senior College,Osmanabad.

# Lecture Series On 'Study of History'

2nd to 5th February 2022.

Organized by Department of History.

## Time: 4.30 pm to 5.30 pm


**You Can Join Through Following Google Meet Link**

https://meet.google.com/mub-fzqt-qdb


| *Date* | *Speaker* | *Topic* |
|---|---|---|
| 02/02/2022 | Pro.Dr.Chandrakant Chavan | History of Indian National Movement |
| 03/02/2022 | Pro.Dr.Uttara Khadilkar | History of Delhi Sultanat |
| 04/02/2022 | Pro.Dr.Ravikiran Jadhav | History of Ancient India |
| 05/02/2022 | Pro.Dr.Prashant Deshmukh | Historiography |


Pro.Dr.Jayshree Kulkarni-Deshmukh
Hod


Pro.Dr.Prashant Chaudhari
Principal





इतिहास अभ्यास व्याख्यानमाला – प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी आणिइतिहास अभ्यास व्याख्यानमालापहिले पुष्प गुंफतानाप्रा.डॉ.चंद्रकांत चव्हाण.- ०२/०२/२०२२












इतिहास अभ्यास व्याख्यानमाला दुसरे पुष्प गुंफताना प्रा.डॉ.उत्तरा खाडिलकर.- ०३/०२/२०२२






इतिहास अभ्यास व्याख्यानमाला  तिसरे पुष्प गुंफतानाप्रा.डॉ.रविकिरण जाधव.- ०४/०२/२०२२




इतिहास अभ्यास व्याख्यानमाला  चौथे पुष्प गुंफतानाप्रा.डॉ.प्रशांत देशमुख.- ०५/०२/२०२२

# महाजन महाविद्यालयात चार दिवसीय ऑनलाइन व्याख्यानमालेचा समारोप

**प्रतिनिधी** | उस्मानाबाद

शहरातील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे आयोजित ऑनलाइन व्याख्यानमालेचा सोमवारी (दि.७) समारोप झाला.

याप्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी, इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी-देशमुख उपस्थित होते. महाविद्यालयात २ ते फेब्रुवारी दरम्यान ही व्याख्यानमाला घेण्यात आली. बुधवारी (दि.२) सोलापूर येथील वालचंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी 'भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास' या विषयावर व्याख्यान दिले. गुरुवारी (दि.३) रायगडमधील पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील प्रा. डॉ. उत्तर खाडिलकर यांनी 'सुलतानशाहीच इतिहास' या विषयावर व्याख्या दिले. शुक्रवारी (दि.४) प्रा. डॉ रविकिरण जाधव यांनी 'प्राची भारताचा इतिहास' या विषयाव व्याख्यान दिले. शनिवारी (दि.५ शेंदुर्णी येथील गरुड महाविद्यालयाती प्रा. डॉ. प्रशांत देशमुख यांनी 'इतिहार लेखनशास्त्र' या विषयावर व्याख्या दिले. या व्याख्यानमालेत महाराष्ट्राती विविध प्राध्यापक व विद्यार्थ्यां सहभाग नोंदविला. यशस्वितेसाठी प्रा डॉ. जयश्री कुलकर्णी-देशमुख, प्रा रवींद्र कुलकर्णी, प्रा. सज्जन देव्हारे प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ यांन परिश्रम घेतले.

**पुण्य नगरी**

# महाजन महाविद्यालयात ऑनलाईन व्याख्यानमालेस प्रतिसाद

**पुण्य नगरी** | वृत्तसेवा

**उस्मानाबाद:** येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आलेल्या चार दिवसीय व्याख्यानमालेस प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी, इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी देशमुख यांची उपस्थिती होती. २ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत व्याख्यानमाला घेण्यात आली. २ फेब्रुवारीला सोलापूर येथील वालचंद महाविद्यालयातील प्रा.डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास या विषयावर व्याख्यान दिले. ३ फेब्रुवारीला रायगड जिल्ह्यातील पेण येथील प्रा.डॉ. उत्तरा खाडिलकर यांनी सुलतान शाहीचा इतिहास या विषयावर व्याख्यान, ४ फेब्रुवारीला प्रा.डॉ.रविकिरण जाधव यांनी प्राचीन भारताचा इतिहास या विषयावर तर ५ फेब्रुवारी या दिवशी शेंदुर्णी येथील गरुड महाविद्यालयातील प्रा.डॉ.प्रशांत देशमुख यांनी इतिहास लेखन शास्त्र या विषयावर व्याख्यान दिले. व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला. ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी देशमुख, प्रा.रवींद्र कुलकर्णी,प्रा.सज्जन देव्हारे, प्रा.डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी परिश्रम घेतले.

**Smart Osmanabad**
Page No.3 February 08, 2022

**लोकमत**

# महाजन महाविद्यालयात व्याख्यानमालेचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद :** येथल व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेचा समारोप सोमवारी करण्यात आला. यावेळी प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी, इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ.जयश्री कुलकर्णी देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने २ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत ही व्याख्यानमाला पार पडली. यात सोलापूर येथील वालचंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी २ फेब्रुवारीला 'भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास' या विषयावर व्याख्यान दिले. ३ फेब्रुवारीला रायगड जिल्ह्यातील पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील प्रा. डॉ. उत्तरा खाडिलकर यांचे 'सुलतानशाहीचा इतिहास' या विषयावर, ४ रोजी प्रा. डॉ. रविकिरण जाधव यांचे 'प्राचीन भारताचा इतिहास' या विषयावर, तर ५ फेब्रुवारीला शेंदुर्णी येथील गरुड महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रशांत देशमुख यांनी 'इतिहास लेखन शास्त्र' या विषयावर व्याख्यान दिले.

या व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला. व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी-देशमुख, प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्रा. सज्जन देव्हारे, प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ, आदींनी पुढाकार घेतला.

Hello Osmanabad
Page No. 2 Feb 08, 2022
Powered by: erelego.com

# चार दिवसीय व्याख्यानमालेचा समारोप



**उस्मानाबाद**-व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे आयोजित ऑनलाईन पद्धतीने झालेल्या व्याख्यानमालेचा समारोप आज करण्यात आला.या कार्यक्रम ला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी,इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी देशमुख यांची उपस्थिती होती.महाविद्यालयातील इतिहास विभागातर्फे या ऑनलाईन व्याख्यान मालेचे आयोजन दिनांक ०२ फेब्रुवारी ते ०५ फ ब्रुवारी या दरम्यान करण्यात आले होते. या व्याख्यानमालेत दिनांक ०२ फेब्रुवारीला सोलापूर येथील वालचंद म हाविद्यालयातील प्रा.डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास या विषयावर व्याख्यान दिले.दिनांक ०३ फेब्रुवारीला रायगड जिल्ह्यातील पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील प्रा.डॉ. उत्तरा खाडिलकर यांनी सुलतान शाहीचा इतिहास या विषयावर व्याख्यान दिले.दिनांक ०४ फ ब्रुवारी रोजी प्रा.डॉ.रविकिरण जाधव यांनी प्राचीन भारताचा इतिहास या विषयावर व्याख्यान दिले.दिनांक ०५ फेब्रुवारी या दिवशी शेंदुर्णी येथील गरुड महाविद्यालयातील प्रा.डॉ.प्रशांत देशमुख यांनी इतिहास लेखन शास्त्र या विषयावर व्याख्यान दिले.

या व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला. ही व्याख्यानम ाला यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी देशमुख, प्रा.रवींद्र कुलकर्णी,प्रा.सज्जन देव्हारे, प्रा.डॉ.विनोदकुमार वायचळ यांनी परिश्रम घेतले.

# ‘ इतिहास अभ्यास व्याख्यानमाला’

## बुधवारदि. ०२ ते शुक्रवार दि.०५ फेब्रुवारी २०२२

### दुपारी४.३० ते ५.३० वा

उद्दिष्टे :-
१. कोविड-19 च्या महामारीच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मदत करणे.
२.विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास.
३. सध्याच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक परिस्थितीची तुलना , विश्लेषण आणि आकलन करण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.
४.इतिहासाशी संबंधित तथ्ये, घटना, संकल्पना आणि तत्त्वे यांची ओळख करून देणे.

भाऊसाहेब नेने महाविद्यालयासोबत झालेल्या सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे सहयोगी उपक्रम म्हणून इतिहास विभागातर्फे "इतिहास अभ्यास व्याख्यानमाला" या विषयावर चार दिवसांची विशेष (ऑनलाइन) व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. भाऊसाहेब नेने महाविद्यालय , पेण आणि डीबीएफ दयानंद कला आणि विज्ञान महाविद्यालय , सोलापूर यांचे यामध्ये सहकार्य लाभले. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य. प्रो. डॉ. प्रशांत चौधरी हे या सत्रांच्या अध्यक्षस्थानी होते. इतिहास विभाग प्रमुख प्रो. डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले, तर श्री. रवींद्र कुलकर्णी यांनी वक्त्यांचे परिचय व आभारप्रदर्शनाची जबाबदारी पार पाडली. या व्याख्यानमालेचा महाराष्ट्रातील ५ विद्यापीठातील सुमारे १०० विद्यार्थी आणि अभ्यासकांनी लाभ घेतला.

**दिवस १. दि. ०२.०२.२०२२, बुधवार वेळ- दुपारी ४.३० ते ५.३० वा**

**व्याख्यान विषय: भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास (इ.स.१८८५ ते १९४७).**

**साधन व्यक्ती:- प्रो. डॉ. चंद्रकांत चव्हाण, पीएच.डी. सेट (इतिहासाचे प्राध्यापक, वालचंद कॉलेज. सोलापूर)**
डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास ( इ.स.१८८५ ते १९४७) या विषयावर व्याख्यान दिले. हे व्याख्यान ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारतातील ब्रिटिश राजवटीवर ( १९ वे आणि २०वे शतक) आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी भारतीयांनी घेतलेले प्रयत्न यावर त्यांनी सखोल चर्चा केली. तसेच "औपनिवेशिक "विकास प्रथम अजेंड्यावर कसा आला आणि नंतर ते कार्य कसे प्रत्यक्षात उतरले यावर प्रकाश टाकला. ब्रिटिशांनी भारतात साम्राज्य स्थापन केले आणि भारताची संपत्ती शोषण केले,तसेच जागृत झालेल्या भारतीयांनी तसेच भारतीय क्रांतिकारी चळवळ , राष्ट्रीय लीग आणि इतर संघटना आणि भारतीय नेते यांनी केलेल्या भारताच्या स्वातंत्र्यासाठीच्या प्रयत्नांचे वर्णन केले.

**दिवस 2 दि. ०३.०२.२०२२, गुरुवार वेळ- दुपारी ४.३० ते ५.३० वा**

**व्याख्यान विषय: दिल्ली सल्तनतचा इतिहास (इ.स. १२०० ते १५२६).**

**साधन व्यक्ती :-प्रो. डॉ. उत्तरा खाडिलकर पीएच.डी. (प्राध्यापक, इतिहास विभाग,. भाऊसाहेब नेने कॉलेज, पेण.)**

प्रो. डॉ. उत्तरा खाडिलकर यांनी दिल्ली सल्तनतचा इतिहास ( इ.स. १२०० ते १५२६ ) या विषयावर व्याख्यान दिले. हे व्याख्यान इतिहासाच्या स्त्रोतांवर आणि दिल्ली सल्तनतच्या राजकीय , प्रशासकीय, आर्थिक, कलात्मक, सांस्कृतिक , धार्मिक आणि सामाजिक इतिहासावर केंद्रित होते. दिल्ली सल्तनतच्या विविध राजघराण्यांचा आढावा घेतानाच प्रो. डॉ. उत्तरा खाडिलकर यांनी या राजवटींची धोरणे व त्यांचे परिणाम यावरही भाष्य केले. विद्यापीठ परीक्षेच्या दृष्टीने या अभ्यासपत्रिकेची तयारी कशी करायची याविषयी माहिती देतानाच विविध स्पर्धा परीक्षांसाठी या माहितीचे महत्त्वही त्यांनी विषद केले.

**दिवस 3. दि.०४.०२.२०२२, शुक्रवार वेळ- दुपारी ४.३० ते ५.३० वा**

**व्याख्यान विषय:** -सिंधू संस्कृतीच्या विशेष संदर्भासह प्राचीन भारताचा इतिहास

**साधन व्यक्ती प्रो. डॉ. रविकिरण जाधव पीएच.डी., (प्राध्यापक आणि विभागप्रमुख प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती आणि इतिहास विभाग, डीबीएफ दयानंद कला, विज्ञान महाविद्यालय, सोलापूर).**

प्रा. डॉ. रविकिरण जाधव यांनी सिंधू संस्कृतीच्या विशेष संदर्भासह प्राचीन भारताच्या इतिहासावर या व्याख्यानात प्रकाश टाकला. इतिहास म्हणजे काय , संस्कृती म्हणजे काय आणि या संस्कृतीचा वारसा काय, या विषयावर त्यांनी चर्चा केली. त्यानंतर इतिहास , पाषाणयुग -पुराश्म युग आणि नवाश्म युग , सिंधू सभ्यता , महाजनपद आणि भारतीय साम्राज्ये इत्यादींविषयी माहिती दिली. त्यांनी भारतातील उत्खनन , कलाकृतींवर प्रकाश टाकला. शिवाय सिंधू सभ्यता. त्यातील पुरातन वस्तू, वास्तू दर्शविणाऱ्या स्लाइड्स सादर केल्या.

**दिवस ४. दि.०५.०२.२०२२, शनिवार वेळ- दुपारी ४.३० ते ५.३० वा**

**व्याख्यान विषय: -इतिहासलेखनशास्त्र**

**साधन व्यक्ती प्रो. डॉ प्रशांत देशमुख पीएच.डी., (प्राध्यापक आणि विभागप्रमुख. इतिहास, गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी)**

प्रो. डॉ प्रशांत देशमुख यांनी इतिहासलेखनशास्त्रावर व्याख्यान दिले. इतिहासलेखन म्हणजे काय याबद्दल त्यांनी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. इतिहासाचे स्त्रोत , इतिहासाचे लेखन, विशेषत: स्त्रोतांच्या परीक्षणावर आधारित इतिहासाचे लेखन , त्या स्त्रोतांमधील अस्सल सामग्रीमधून विशिष्ट तपशीलांची निवड आणि त्या तपशीलांचे विश्लेषण अशा विषयांवर त्यांनी चौफेर प्रकाश टाकला. जे वस्तुनिष्ठतेच्या कसोटीवर टिकते, तेच इतिहासलेखनासाठी उपयुक्त साधन होय,असे वक्तव्य त्यांनिकेले. याशिवाय त्यांनी इतिहासाचे प्रकार , इतिहास लेखनाचा ट्रेंड आणि भारतीय इतिहास लेखन आणि इतिहासकार यांची माहिती दिली. इतिहासलेखनशास्त्र विषयाची परीक्षेच्या दृष्टीने कशी तयारी करावी हेही विद्यार्थ्यांना सांगितले.

सदर व्याख्यानमालेला पुणे, मुंबई, रायगड, नांदेड, जालना, उस्मानाबाद, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यातून विद्यार्थी व अध्यापाकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

**उद्दिष्ट पूर्ती** :-

या व्याख्यानांच्या आयोजनाने कोविड-19 च्या साथीच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मदत झाली. प्रत्यक्ष परीक्षेला सामोरे जाताना आदर्श उत्तरपत्रिका

लेखन कसे करावे याचे मार्गदर्शन मिळाले. ऑफलाईन परीक्षेबाबत निर्माण झालेली भीती कमी करण्यास मदत झाली.सध्याच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक परिस्थितीची तुलना, विश्लेषण आणि आकलन होण्यास विद्यार्थ्यांना मदत झाली.इतिहासाशी संबंधित तथ्ये , घटना, संकल्पना आणि तत्त्वे यांची ओळख त्यांना झाली.







इतिहास विभाग आयोजित 'पर्यटन व्यवस्थापन आणि मराठवाड्यातील पर्यटन'या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्धाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.कुलकर्णी जे.आर. आणि **उपस्थितकला, विज्ञान व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी-** २५.०४.२०२२







इतिहास विभाग व इंग्रजी विभागाच्या वतीने आयोजित प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना इंग्रजीविभाग प्रमुख प्रा.डॉ.बनाळे ए.आर., डॉ. माने एम. यू. आणि **उपस्थितकला, विज्ञान व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी**- २५.०४.२०२२

## पर्यटनाचे व्यवस्थापन आणि मराठवाड्यातील पर्यटन'

## प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## उद्घाटन कार्यक्रम

**दिनांक २५ एप्रिल २०२२, सोमवार**

**उद्देश :-**

विद्यार्थ्यांना पर्यटनाची, पर्यटन क्षेत्राशी संबंधीत व्यावसायिक संधी, स्थानिक ऐतिहासिक पर्यटन स्थळे यांची माहिती व्हावी, आवड व जिज्ञासा निर्माण व्हावी. तृतीय वर्षाच्या इतिहासाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात असलेल्या इतिहासाची क्षेत्रे या अभ्यासपत्रिकेचा सखोल अभ्यास व्हावा. तसेच देशाचा सजग नागरिक म्हणून पर्यावरण संरक्षण व संवर्धन याची जाणीव व्हावी, हा या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या आयोजनामागील उद्देश होय.

दि. २५.०४.२०२२ , सोमवार रोजी सकाळी ११.३० वाजता कक्ष क्रमांक ९ मध्ये इंग्लिश विभागाच्या व इतिहास विभागाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा उद्घाटन कार्यक्रम संयुक्तरीत्या आयोजित करण्यात आला. यामध्ये इतिहास विभागाच्या 'पर्यटनाचे व्यवस्थापन आणि मराठवाड्यातील पर्यटन' या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, महत्व व उपयुक्तता इत्यादी माहिती प्रा डॉ कुलकर्णी जे . आर. यांनी कला, विज्ञान व वाणिज्य विभागातील उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. तर इंग्लिश विभागाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची माहिती प्रा डॉ बनाळे ए. आर.व डॉ. माने एम. यु. यांनी दिली.

## प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्तता


२५ एप्रिल २०२२ ते ३० जून २०२२

दि. २५.०४.२०२२, सोमवार रोजी इंग्लिश विभागाच्या व इतिहास विभागाच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा उद्घाटन कार्यक्रम संयुक्तरित्या आयोजित करण्यात आला. 'पर्यटनाचे व्यवस्थापन आणि मराठवाड्यातील पर्यटन ' या विषयावरील ४ क्रेडीटचा हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम इतिहास विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता तयार करण्यात आलेला होता. या अभ्यासक्रमासाठी १६ विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदविला . २६ एप्रिल २०२२ ते ३० जून २०२२ या कालावधीत हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविला गेला. त्यामध्ये पर्यटन: अर्थ, संकल्पना, व्याख्या, उद्दिष्टे, स्वरूप, व्याप्ती व प्रेरणा, पर्यटनाचे प्रकार- प्रादेशिक , राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ,पर्यटनाच्या स्वरूपावरून प्रकार, पद्धती, महत्त्व व वैशिष्ट्ये व मराठवाड्यातील पर्यटन विकास, शासनाची भूमिका आणि संभाव्य रोजगार संधी- वाहतूक , आवास-निवास ,भोजन, बाजारपेठ व सेवा कार्य **तसेच** मराठवाड्यातील निवडक पर्यटन स्थळे- ज्योतिर्लिंगे , शक्तीपीठे,लेणी, किल्ले, स्मारके, व ऐतिहासिक वास्तू (औंढा-नागनाथ , घृष्णेश्वर , परळी वैजनाथ ,तुळजापूर,अजिंठा- वेरूळ-धाराशिव लेणी ,परंडा- औसा- नळदुर्ग इ.किल्ले, बीबी का मकबरा, कुंथलगिरी, तेर नगरी व इतर स्थानिक स्थळे या घटकांचा व संदर्भ साधनांचा समावेश करण्यात आला.

एकूण ४ क्रेडीट (६० तासिका )च्या या अभ्यासक्रमाचे वेळापत्रक तयार करून सकाळी ८.००ते ८.४५ यावेळेत नियमित तासिका घेण्यात आल्या. यासंदर्भातील WhatsApp Group तयार करून विद्यार्थ्यांना परीक्षा व इतर माहिती देण्यात आली. यानंतर दिनांक ३० जून २०२२, गुरुवार रोजी सकाळी ८.०० ते ९.३० यावेळेत या अभ्यासक्रमावर आधारित ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत १६ विद्यार्थ्यांपैकी ६ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य, तर १० विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी प्राप्त झाली. दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात यशवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

उद्देशपूर्ती :-

विद्यार्थ्यांना पर्यटनाची, पर्यटन क्षेत्राशी संबंधीत व्यावसायिक संधी, स्थानिक ऐतिहासिक पर्यटन स्थळे यांची माहिती होऊन या विषयाची आवड व जिज्ञासा निर्माण होण्यास मदत झाली. तृतीय वर्षाच्या इतिहासाच्या विद्यार्थ्यांना इतिहासाची क्षेत्रे या अभ्यासपत्रिकेत असलेल्या पर्यटनशास्त्र या घटकाचा सखोल व प्रात्यक्षिक आधारित अभ्यास करण्यास मदत झाली. तसेच देशाचा सजग नागरिक म्हणून पर्यावरण संरक्षण, संवर्धन, जतन व प्रसार याची जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.







विद्यार्थ्यांना offline परीक्षेसंदर्भात मार्गदर्शनासाठी online तासिका दिनांक-३१.०५.२०२२

# विद्यापीठ परीक्षे संदर्भात ONLINE पद्धतीने मार्गदर्शन

**दि. ३१.०५.२०२२, मंगळवार**

उद्देश :-

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये COVID-19 च्या साथीच्या काळात साथीच्या प्रदुर्भावाच्या कमी-जास्ती प्रमाणानुसार ONLINE- OFFLINE अशा दोन्ही पद्धतीने अध्यापन व मुल्यांकन दोन्ही प्रक्रिया चालू राहिल्या. या सगळ्या गोष्टींचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययन व आकलन यावर झाला. COVID-19 चा प्रसार आटोक्यात आल्यानंतर मागील दीड वर्षात online पद्धतीने सुरु असलेल्या विद्यापीठ परीक्षां ऐवजी offline पद्धतीने विद्यापीठ परीक्षेस विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागणार . त्यामुळे त्यांचा गोंधळ कमी व्हावा, त्यांना विश्लेषणात्मक उत्तरे व्यवस्थित लिहितायावीत हा या मार्गदर्शनामागचा उद्देश होय.


WhatsApp group वरील पुर्वसूचनेनुसार बी ए प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी google meet च्या सहाय्याने online पद्धतीने (अद्याप साथरोगाची बंधने पूर्णत: शिथिल न झाल्याने )मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. सायंकाळी ५.३० ते ६.३० यावेळेत आयोजित या मार्गदर्शनात इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. कुलकर्णी जे. आर. यांनी तिन्ही वर्षाच्या अभ्यासक्रमाधारित PPT च्या सहाय्याने मुद्देसूद व नेमकी उत्तरे कशी लिहावीत, टिपा, संज्ञा, संकल्पना, घटना,घटक कसे स्पष्ट करावेत, वस्तुनिष्ठ प्रश्नांची तयारी कशी करावी हे उदाहरणासह स्पष्ट केले. उत्तरपत्रिका हाती आल्यावर त्यावरील माहिती कशी भरावी, समास कसा आखावा, प्रमुख मुद्दे, उपमुद्दे व त्यातील छोटे मुद्दे यांचे अनुक्रम कशापद्धतीने द्यावेत, उत्तराची रचना, प्रश्नांचा अर्थ लक्षात घेऊन उत्तरमांडणी इत्यादी सूक्ष्म मुद्द्यांवरही मार्गदर्शन करण्यात आले. शेवटी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही केले गेले.

या online मार्गदर्शनाचा लाभ साधारण ४० विद्यार्थ्यांनी घेतला

तासिकेची लिंक :-**https://meet.google.com/ykx-qhmd-gcm**

उद्देशपूर्ती :-

मागील दीड वर्षात online पद्धतीने सुरु असलेल्या विद्यापीठ परीक्षांच्या पार्श्वभूमीवर offline पद्धतीने विद्यापीठ परीक्षेस सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययन व आकलन याबरोबरच वस्तुनिष्ठ प्रश्नांसोबतच विश्लेषणात्मक उत्तरे व्यवस्थित लिहिण्याचे कौशल्य आत्मसात होण्यास, परीक्षेच्या ऐनवेळी गोंधळ कमी होण्यास मदत झाली. परीक्षेची भीती कमी होण्यास मदत झाली.






बी ए द्वितीय वर्षाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी online पद्धतीने REMEDIAL COACHING दि.१५,१६/०२/२०२२

# REMEDIAL COACHING

## मंगळवार, बुधवार दि. १५ व १६ फेब्रुवारी २०२२

### उद्देश :-

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये COVID-19 च्या साथीच्या काळात साथीच्या प्रदुर्भावाच्या कमी-जास्ती प्रमाणानुसार ONLINE- OFFLINE अशा दोन्ही पद्धतीने अध्यापन व मुल्यांकन दोन्ही प्रक्रिया चालू राहिल्या. या सगळ्या गोष्टींचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापन व परीक्षेतील गुणप्राप्तीवर झाला. मागील शैक्षणिक वर्षातील बी ए द्वितीय वर्षाच्या चतुर्थ सत्राच्या,तसेच COVID-19 च्या प्रादुर्भावामुळे एखादे वर्ष शिक्षणात GAP पडलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाण्यासाठी वस्तुनिष्ठ व विश्लेषणात्मक उत्तरे व्यवस्थित लिहिता यावीत, उत्तीर्ण होण्यास मदत व्हावी हा या मार्गदर्शनामागचा उद्देश होय.

WhatsApp group वरील पुर्वसूचनेनुसार बी ए द्वितीय वर्षाच्या चतुर्थ सत्राच्या इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १५ रोजी सकाळी ९.२० वाजता आणि १६ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता google meet च्या सहाय्याने online पद्धतीने (अद्याप साथरोगाची बंधने शिथिल न झाल्याने )REMEDIAL COACHING आयोजित करण्यात आले. यामध्ये मागील शैक्षणिक वर्षातील बी ए द्वितीय वर्षाच्या चतुर्थ सत्राच्या, तसेच COVID-19 च्या प्रादुर्भावामुळे एखादे वर्ष

शिक्षणात GAP पडलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, त्यातील महत्वाचे घटक, ONLINE पेपर OPEN करण्याची आणि SUBMIT करण्याची प्रक्रिया, वस्तुनिष्ठ उत्तरे सोडविण्याची पद्धती, चांगले गुण मिळविण्यासाठी नेमकी उत्तरे देण्याची पद्धत इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. कुलकर्णी जे. आर. यांनी हे मार्गदर्शन केले.

या मार्गदर्शनाचा लाभ ९ विद्यार्थ्यांनी घेतला.

तासिकांची लिंक :- दिनांक १५.०२.२०२२ –https://meet.google.com/oav-jfmv-poz

दिनांक १६.०२.२०२२ - https://meet.google.com/fcv-awum-jxq

## उद्देशपूर्ती :-

मागील शैक्षणिक वर्षातील बी ए द्वितीय वर्षाच्या चतुर्थ सत्राच्या, तसेच COVID-19 च्या प्रादुर्भावामुळे एखादे वर्ष शिक्षणात GAP पडलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाण्यासाठी वस्तुनिष्ठ व विश्लेषणात्मक उत्तरे व्यवस्थितलिहिण्यास मदत झाली. त्यांच्या शंकांचे निरसन झाले. त्यांना चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी तयारी करण्यास मदत झाली. परीक्षेची भीती कमी होण्यास मदत झाली.